P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०४/०८/२०२२

## दि.०३/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी पोस्टे ५७१/२०२२ भा.द.वि.क. ३०७,५०४,३४ आर्म ॲक्ट ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०८/२०२२ रोजी २२.०० वा. ते २३.१० वा. चेदरम्यान स्वरुप वाईन समोर,आकुर्डी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०८/२०२२ रोजी १२.१७ वा. |
| फिर्यादी | :- | गोपाळ अंकुश हाळनुर वय २७ वर्षे रा. जयगणेश हौसिंग सोसायटीघरनं ४०१, घरकुल चिखली |
| आरोपी | :- | १)राजन आलबु शहा वय २१ वर्षे रा. महाराष्ट्र ज्वेलर्स पाठीमागे तेजस वडापाव जवळ दत्तवाडी आकुर्डी पुणे २)मोम्या ऊर्फ शाहाबज रशिद मोमीन,वय-२२ वर्षे रा.गंगानगर,आकुर्डी,पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र अनिकेत कदम यांचेशी बोलत असताना आरोपी क्रं १ मध्येच येवून बोलू लागल्याचे कारणावरून फिर्यादी व आरोपी क्रं १ याचेमध्ये किरकोळ वाद होवून शिवीगाळ झाली होती साधारण २२.३० वा चे सुमारास सदर ठिकाणी आरोपी क्रं. १ व २ येवुन काही वेळापुर्वी झालेल्या भांडणाचा वाद उकरुन काढुन संगनमताने आरोपी क्रं १ याने फिर्यादी यांस शिवीगाळ करून, तुला आज जीवंत सोडत नाही असे म्हणून फिर्यादी यांस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याने सोबत आणलेल्या कोयत्यासारख्या हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात वार केले आहेत. त्याचवेळी आरोपी क्रं. २ याने फिर्यादी यांस मारण्यासाठी रोडवर पडलेला पेव्हर ब्लॉक उचलला म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शेळके ७५२२९०७०७० |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४७२/२०२२ भादविकलम ३९२, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०८/२०२२ रोजी २२/३० वाचे सुमारास जय मल्हार हॉटेलचे पुढे,तुकाराम महाराज पादुका मंदीर समोर, डुडुळगाव मोशी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०८/२०२२ रोजी १४/५८ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम |
| तपशिल | :- | वर नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांची वहिनी असे त्यांचा भाचा यास दवाखान्यातुन उपचार करुन मोपेडे वरुन घरी जात असताना दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकल वरुन (नंबर माहिती नाही) पाठीमागुन येवुन फिर्यादीचे गळयातील ३०,०००/- रुपये किंमतीची ७,५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हिसका मारुन जबरदस्तीने चोरुन नेली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | ए.बी. तरंगे, पोलीस उपनिरीक्षक ८३२९११९२९४ |

३.

| | |
|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- चाकण १२३७/२०२२ भा.द.वि.का.क ३९२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- दिनांक ०३/०८/२०२२ रोजी रात्रौ २०.०० वा.चे सुमारास मौजे चाकण गांवचे हददीत मुटकेवाडी येथील मांजरे क्रेनचे ऑफिस समोर |
| गुन्हा दाखल | :- दि ०३/०८/२०२२ रोजी २३/३४ वा |
| फिर्यादी | :- अक्षय चरन चौहान वय २४ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा.अविनाश भाऊराव राठोड यांचेकडे साई धाम बिल्डींग मधील फलॅट नंबर ७ मध्ये बालाजीनगर, मेदनकरवाडी ता.खेड जि.पुणे मुळ रा.चोर खोपडी ता.दारवा जि.यवतमाळ |
| आरोपी | :- भुवेश बुदधरामजी महाले वय २३ वर्षे धंदा मजुरी रा.शिवणी ता.आमगांव जि.गोंदिया<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- वरील तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मौजे चाकण गांवचे हददीत मुटकेवाडी येथील मांजरे क्रेनचे ऑफिस समोर चाकण बाजुकडून पुणे बाजुकडे चालत जात असतांना फिर्यादी यांचे समोरुन आलेला इसम नमुद आरोपी याने जबरदस्तीने फिर्यादी यांचे हातातुन फिर्यादी यांचा १३,०००/- रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा ए १६ मॉडेलचा मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेला असुन त्यास पाठलाग करुन पकडुन पोलीसांना बोलवुन पोलीस स्टेशनला घेवुन आलो आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- पोसई बामणे ९५५२५३०५६३ |

४.

| | |
|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- निगडी ५७२/२०२२ भा.द.वि कलम ३७६,३७६(२)एन,३५४(ड),५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- दि.०३/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. ते ०३.०० वा. चे दरम्यान लवबर्ड लॉजेस, दुर्गाचौक, यमुनानगर,निगडी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- दि.०३/०८/२०२२ रोजी २०/३०/वा. |
| फिर्यादी | :- महिला फिर्यादी |
| आरोपी | :- गोपाल बा-हे,वय-अंदाजे ३० ते ३५,रा.मोरे वस्ती (पुर्णनाव व पत्ता माहित नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी राहते घरातुन भाजी आणण्यासाठी गेल्या असता फिर्यादी यांचे परीसरात राहणारा इसम नमुद आरोपी याने फिर्यादी यांचा पाठलाग करुन साधारण १२.३० वाचे सुमारास फिर्यादी खंडोबा मंदिर समोरील फुटपाथवर,खंडोबा माळ,निगडी,पुणे येथे बसले असताना त्याठिकाणी येवुन उभा राहिला व फिर्यादी यांस ,'' माझे गाडीवर बस नाहीतर तुला मारुन टाकील.''असे बोलल्याने फिर्यादी घाबरुन भितीने आरोपीच्या गाडीवर बसल्या व आरोपीने फिर्यादी यांस जबरदस्तीने लवबर्ड लॉज, दुर्गाचौक,यमुनानगर,निगडी येथे घेवुन जावुन फिर्यादी यांस त्यांचे आईवडीलांस मारुन टाकण्याची धमकी देवुन आरोपीने फिर्यादी यांचे सोबत त्यांची संमती नसताना दोन वेळा जबरदस्तीने शारीरिक संबध केले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- श्री दत्तात्रय मोरेपो. उप निरिक्षक ९४२०९३८६९३ |

५.

| | |
|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- हिंजवडी ७३०/२०२२ भा.द.वि.कलम ३२३,३२४,१४३,१४७,१४९ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- दि.०२/०८/२०२२ रोजी २१/५१ वा.चे सुमारास बिटवाईज कंपनी जवळ सुसगाव रोड पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- दि.०३/०८/२०२२ रोजी ०३/२५ वा. |
| फिर्यादी | :- आकाश सुनिल पगारे, वय- २२ वर्षे, धंदा- नोकरी, रा.योगेश धनकुडे यांची रुममध्ये भाडयाने धनकुडे वस्ती |

| | | |
|---|---|---|
| | | बाणेर पुणे,मुळ रा. म्हाडा कॉलनी जालना |
| आरोपी | :- | भागवत हावळे, वय-२२ वर्षे,रा. तिर्थ टॉवर जवळ सुस गाव पुणे मोन ८६२५८४३१०३ व त्याचे सोबत असलेले ४ अनोळखी अंदाजे २० ते २५ वय असलेले इसम नाव पत्ता महित नाही. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी झोमॉटो डिलीव्हरी करीत असताना यातील आरोपी याने फिर्यादीस फोन करून बोलावुन घेवुन बिटवाईज कंपनी जवळ सुसगाव रोड पुणे येथे आरोपी याने त्याचे इतर ४ सहकारी सोबत बेकायदेशीर रित्या एकत्र जमुन,संगणमत करून आरोपी क्रं १ यांने फिर्यादीस त्याचे व आरोपी क्रं १ ची भाची हिचेसोबत काही संबध आहेत का, याचा संशय घेवून फिर्यादीस व फिर्यादी चा मित्र करण गायके याला आरोपी क्रं १ व त्याचे २ मित्र (नाव पत्ता महित नाही) यांनी वाईट वाईट शिवीगाळ करून हाताने मारहाण केली, तसेच गणेश गायके याला आरोपी क्रं १च्या आणखीन २ मित्रांनी लांकडी दांडक्याने शारीरावर डोक्यात,पाठीत,हातापायावर मारुन जखमी केले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउनि यशवंत साळुंके ९०११०११४१७ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड ६७४/२०२२ भादंविक ४४७, ३७९, १४१, १४३,१४९,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/०५/२०२२ रोजी सकाळी ११:०० वा. ते दि.०९/०५/२०२२ रोजीचे सकाळी ०९:०० वा.चे दरम्यान व दि. १२/०५/२०२२ रोजी मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील सर्व्हे नं. १६१/२ब येथील १० आर क्षेत्र येथे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०३/०८/२०२२ वेळ १७/३६ वा. |
| फिर्यादी | :- | हरीश मगारामजी माळी, वय ५० वर्षे, धंदा व्यवसाय, रा. भोईर प्लाझा, १९/०३, डांगे चौक, थेरगाव, |
| आरोपी | :- | १) चुघ व इतर ०७ ते ०८ कर्मचारी **आरोपी अटक नाही** शोध चालु आहे |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी मजकुर यांनी फिर्यादीचे कायदेशिर मालकीच्या व ताबे वहिवाटीचे गाव मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील सर्व्हे नं. १६१/२ब येथील १० आर क्षेत्रावर बेकायदेशिर रित्या अतिक्रमण करुन ६५,०००/- रुपये किं.चे तारेचे कंपाऊंड व फ्लेक्स बोर्ड असे चोरी करुन नेले. तसेच दिनांक १२/०५/२०२२ रोजी फिर्यादी यांचे कायदेशिर मालकीच्या व ताबे वहिवाटीचे क्षेत्रावरील ताबा परत घेत असताना चुघ व त्यांचे ०७ ते ०८ कर्मचारी यांनी फिर्यादी यांना धमकी दमदाटी करीत परत सदर जागेवर येऊ नका अशी दमदाटी केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | संतोष पाटील, सहा.पोलीस निरीक्षक ९०११०७९१९७ |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी६३९/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे क ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २८/०३/२०२२ रोजी १४.०० ते १४.४० वा ते १६.०७ ते १७.०७ वा चे दरम्यान नगररचनाविभाग ,पिंपरी चिंचवड मनपा येथील कार्यालयात पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०८/२०२२ रोजी १४.५२ वा |
| फिर्यादी | :- | इम्रान समद खान, वय ३८ वर्षे , धंदा नोकरी , रा. सर्वे नं ११३ शिवशक्ती कॉलनी नढेनगर काळेवाडी पुणे |
| आरोपी | :- | श्री. संदीप लगडे नेम.नगररचना विभाग पिंपरी चिंचवड मनपा पुणे **आरोपी ताब्यात आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी हे काम करत असलेल्या शुभम असोसिएट कंपनीच्या विकास योजनचा अभिप्राय (डी.पी.ओपिनियन) देण्यासाठी नमुद आरोपी यांनी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान |

फिर्यादी यांना पंचासमक्ष ३,५०,०००/- रु लाच मागणी करुन तडजोडीअंती ३,००,०००/- रु चे लाचेची मागणी केली तसेच दि.३०/०६/२०२२ रोजी सदर योजनेमध्ये एरिया कमी झाल्याने ३,००,०००/- रु मागणी केलेल्या रकमेपैकी १,००,०००/- रु कमी करुन रु २,००,०००/- रु लाचेची मागणी केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पो.उप.अधिक्षक ला.प्र.वि. पुणे श्रीमती क्रांती पवार

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ६७५/२०२२ भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- २९/०७/२०२२ रोजी १७/०० वा. पासुन ते दि.०३/०८/२०२२ रोजी १३/०० वा. पर्यंत फिर्यादी यांचे घर १६ नं बस स्टॉप, जवळ हरनाई मोबाईल शॉप चे मागील गल्लीमध्ये थेरगाव.पुणे

गुन्हा दाखल :- दिनांक ०३/०८/२०२२ रोजी १९/१९ वा

फिर्यादी :- अजित महादेव कदम वय-२१ वर्षे धंदा-सोने व चांदी वितळवणे, मुळ रा. पिंपरी खुर्द, ता.आटपाडी. जि. सांगली स.रा. १६ नं बस स्टॉप, जवळ हरनाई मोबाईल शॉप चे मागील गल्लीमध्ये थेरगाव पुणे.मो.न. ७५५८१६१६०८.

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीचे रहाते घराचे खिडकीचे गज तोडुन वाकवुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने आतप्रवेश करुन १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व ३,५०,०००/- रु रोख रक्कम असा एकुण ५,८८,७५०/-रु किं माल घरफोडी करुन चोरुन नेले आहे

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जगताप ९८२२९०९५१०

९.

पोस्टे व गु.रजि.नं :- तळेगाव दाभाडे ३६२/२०२२भा. द. वी कलम ४२०,४०६,४६५,४६७,४७१,१२० ब

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ९/५/२०१७ ते आज रोजी ३/८/२०२२ दुय्यम निंबधक कार्यालय तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे

गुन्हा दाखल :- दिनांक.०३/०८/२०२२ रोजी ०१/०२ वा.

फिर्यादी :- श्री सुमित प्रकाश गवळी, वय ३८ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा.ठी.- लोणावळा गावठाण, ई वॉर्ड, घर नं. १२१, ता. मावळ,

आरोपी :- १) मयुर दत्taराम कदम, वय ३२ वर्षे, रा.ठी.- ३०३, रिचा अपार्टमेंट खडकपाडा, बारावे रोड, कल्याण पष्चिम, मुंबई, २) राजु काषिनाथ जाधव, वय ४३ वर्षे रा.ठी.- खंडाळा गावठाण, घर नं. ३५९, बुध्द विहार च्या पाठीमागे, मुंकुंदनगर, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे ३) बाळु भिकु अबनावे वय ६३ वर्षे, धंदा- हॉटेल व्यवसाय, रा.ठी.- २०/३०४, देवदया नगर, फेज-२, फेज २, फोखरण रोड, नंबर-१, ठाणे ४) रवी माटया पाटील वय ५७ वर्षे, रा.ठी.- मित्र छाया बंगला, आयरे रोड, गावदेवी मंदीर समोर, डोंबीवली, जि. ठाणे ५) उमेष शिवाजी खराडे वय ३५ वर्षे रा.ठी.- जिजाई निवास, नारयणी धाम जवळ, तुंगार्ली, कवल्यधाम जवळ, पुणे ६) अॅड. अनिकेत विलासराव जाधव वय ३२ वर्षे, रा.ठी.- नेरे, ता. मुळषी, जि.पुणे व ७) अनोळखी बोगस व्यक्ती **आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आपआपसात संगनमत करून इसम नामे श्री गोविंद प्रसाद दिनानाथ तिवारी हे महाराष्ट्राबाहेर लांब राहण्यासाठी असल्याचा फायदा घेवुन त्यांच्या नावे बनावट कागदपत्रे बनवुन श्री गोंविंद तिवारी यांच्या जागी बोगस इसम उभा करून जमिन सर्व् हे नं. ३१५/१, याचा जुना सर्व्हे नं. ३१ हिस्सा नं. १/ए, यातील एकुण क्षेत्र ०२ हेक्टर ०३ आर यातील क्षेत्र ०१हेक्टर ६० आर (४ एकर)

या जागेचा बनावट दस्त क्र. ३०८१/२०१७ हा तळेगाव दाभाडे येथे बनवला आहे. व त्याच्या अनुषंगाने पुढे इतर व्यवहार करून जागा आणखी इसमांना विक्री करून दस्त बनवले आहेत व श्री गोविंद प्रसाद दिनानाथ तिवारी यांची फसवणुक केलेली आहे

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पाटील ९१३७२७३४५०

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं | :- | हिंजवडी७२९/२०२२ भादवि कलम ४२०,४०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिंनाक-०२/०८/२०२२ रोजी सकाळी १०/०० वाजलेपासुन ते दुपारी ०१/३० वाजण्याचे सुमारास धरमशी माईलस्टोन बिल्डीग चांदणी चौकाजवळ बावधन पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०८/२०२२ रोजी ००/२७ वा. |
| फिर्यादी | :- | अमरेंद्र मुरलीधर कुलकर्णी. वय-५४ वर्ष, व्यवसाय-रिटायर, रा-सी-२०३, सिलव्हर क्रेस्ट सोसायटी, शिवतीर्थनगर, सुतारदरा जवळ पौड रोड कोथरुड |
| आरोपी | :- | १)प्रविण माथुर. मोनं-८७६६३४७२९६<br>२)एक हिरव्या रंगाचा टिशर्ट व जीन्स पँट घातलेला तोंडाला मास्क लावलेला वय अंदाजे २५ ते ३० वर्ष रा पुर्ण नाव व पत्ता माहीत नाही **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना धरमशी माईलस्टोन बिल्डीग चांदणी चौकाजवळ बावधन पुणे येथे बंधन बँकेचे इंटरव्युह घेणेचे बहाण्याने आरोपी क्रं १ याने आरोपी क्रं २ यास फिर्यादीसोबत मिटींग करण्यासाठी बहाण्याने सदर ठिकाणी पाठविले असता आरोपी क्रं २ याने फिर्यादी यांचा १०,०००/- रु किं रियल मी मोबाईल लबाडीने घेवुन गेला व आरोपी क्रं १ व २ यांनी आपआपसामध्ये संगणमत करुन फिर्यादी यांचे मोबाईलवरुन ऑनलाईन नेटबॅकींगद्वारे एकुण ३,७५,०००/-रुपयांची फसवणुक करुन रक्कमेचा अपहार केला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | महादेव यलमार पोउपनिरी ९४२३२३९९४३ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं | :- | हिंजवडी ७३४/२०२२ भा.दं.वि.क. १८८,३२८, २६९, २७०, २७२, २७३, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०३/०८/२०२२ रोजी १४.१० वा. चे सुमारास हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीतील सपन वाईन शॉप, बानेर, पुणे समोर असलेल्या राजन तिवारी पान टपरीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०८/२०२२ रोजी २१/५१ वा. |
| फिर्यादी | :- | जिलानी मुसा मोमीन सहा.पोलीस फौजदार, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड, |
| आरोपी | :- | १) धमेंद्र सत्यनारायण रांकावत वय ३२ वर्ष धंदा गुटखा विक्री रा.सिध्द्यार्थ रेसिडन्सी, फ्लॅट नं. ०२, मेडी पॉइंट हॉस्पीटल जवळ, डि.पी.रोड, औंध पुणे<br>२) राजन ओमकारनाथ तिवारी वय २४ वर्ष व्यवसाय टपरी चालक, रा. खैरे यांचे बिल्डींगमध्ये, सुर्यमुखी मंदीर समोर, महाळुंगे, पुणे ३) किशोर चौधरी रा. औंध पुणे **आरोपी क्रं १ व २ अटक आहे** |

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी राजन तिवारी पान टपरीमध्ये आरोपी क्रं २ हा वेगवेगळया कंपनीचा मा.अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र यांचे कडील क्र. असुमाअ/अधिसुचना -५२४/७ प्रमाणे दि. २०/०७/२०२२ पासून पुढील एक वर्षा पर्यन्त जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखूजन्य/गुटखा/सुगंधी सुपारी ज्याचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होवून शारिरीक हानी होवू शकते हे माहित असतांना सुध्दा स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करतांना मिळुन आल्याने व आरोपी क्रं १ हा सदरचा प्रतिबंधीत गुटखा पुरवठा करुन देत असतांना दोघांकडुन एकुण १७,५९४/- रुपये किंमतीचा प्रतिबंधीत गुटखा पुरवठा केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | गणेश खारगे सपोनि ९०११००२३३३ |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं | :- | शिरगाव परंदवाडी २६/२०२२ भारतीय हत्यार कायदाकलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चेकलम ३७ (१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०३/०८/२०२२ रोजी १६/४० वा.चे सुमारासके रॉक्स हॉटेलचे पाठीमागे धरणाजवळ, कुसगाव, ता. मावळ, जि. पुणेयेथेघडला असे. |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०३/०८/२०२२ रोजी २३.५५ वा. |
| फिर्यादी | :- | आशिष लक्ष्मण बोटके पोलीसनाईकब.क्र. १०७१, नेमणुकः-खंडणीविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरीचिंचवड. |
| आरोपी | :- | सचिन सुभाष राठोड, वय-२२ वर्षे, रा.केदारी यांचेखोलीत, के रॉक्स हॉटेलजवळ, कुसगावता. मावळ जि.पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने स्वता जवळ किंमत ४०,२००/- रुपयेचे एक लोखंडी गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस (राऊंड) बाळगण्याचा कोणताही कायदेशीर परवाना नसताना, अवैधरित्या जवळ बाळगुन असताना मिळुन आला तसेच मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरीचिंचवड यांचे कार्यालय जावक क्रमांक ६२७४/२०२२ दिनांक २३/०७/२०२२ रोजीचे आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि खाडे ९९२२२५०४९९ |